**नियमित दिवाणी दावा क्रमांक १२३/२०२१**
**निशाणी क्रमांक २७ खालील आदेश**
(CNR : MHSN09008412021)

**(०१).** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द 'कैफियत नाही' असा झालेला आदेश रद्द होवून दाव्यामध्ये म्हणणे व कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा निरंतर ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. तथापि, कोव्हीड-१९ च्या साथीच्या रोगामुळे न्यायालयीन कामकाज बंद असल्याने त्यांना न्यायालयात हजर राहता आले नाही व मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सबब, त्यांचेविरुध्द झालेला 'कैफियत नाही' असा आदेश रद्द होवून त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी देण्याची विनंती त्यांनी केली आहे.

**(०२).** प्रस्तुत अर्जास वादी यांनी नि.क्र.३३ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमुद केलेले कारण खोटे आहे. वादी यांनी कोव्हीड-१९ नंतर नियमित न्यायालयाचे कामकाज सुरु झाल्यानंतर प्रस्तुत दावा दाखल केला आहे व सदर दाव्याचे समन्स प्रतिवादी यांना दिनांक ०९/०७/२०२१ रोजी मिळालेले आहे. वादी यांचे कथन असे की, रे.दि.मु.नं. ६४/२०२१ वरुन एप्रिल-२०२२ मध्ये प्रस्तुत दाव्याची वादी यांना माहिती झाली. परंतू, सदर दाव्यामध्ये प्रतिवादी आजतागायत हजर झालेले नाहीत. त्यामुळे केवळ वादींना मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने गैरहजर राहिले असल्याने त्यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर मे. न्यायालय प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर

करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास प्रतिवादींना जास्तीत जास्त दंड करावा व दंडाची रक्कम वादींना देणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

**(०३).** प्रस्तुत दाव्याची संपूर्ण कागदपत्रे पाहिली. प्रस्तुत कामी प्रतिवादी हे दाव्याचे समन्स रुजू झाल्यानंतर मुदतीत हजर होवुन विहीत मुदतीत कैफियत दिली नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द 'कैफियत नाही' असा आदेश पारित झाला होता. याकामी प्रतिवादी यांना त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्यास जवळपास सात महिन्यांचा विलंब झाल्याचे दिसुन येते. दाव्याचा निकाल गुणदोषावर झाल्यास दोन्ही पक्षांचे नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्यामध्ये कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी देणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दावा गुणदोषावर निर्णित होण्यास मदतच होणार आहे. उपरोक्त नमुद कारणास्तव प्रतिवादी यांना काही रकमेच्या दंडावर त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी देणे उचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

१. अर्ज रक्कम रुपये ३००/- (रुपये तीनशे मात्र) दंड विधी सेवा समितीकडे भरणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी दंडाची रक्कम भरल्यानंतर प्रस्तुत कामी त्यांनी दाखल केलेली कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.01.24 15:46:22 +0530

**तासगांव** (डॉ.आर.एस.कुळकर्णी)

दिनांक : २४.०१.२०२३. सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, **तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – २४ जानेवारी २०२३. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – २४ जानेवारी २०२३. |
| आदेश अपलोड दिनांक | – २४ जानेवारी २०२३. |